॥ महाराष्ट्र धर्म ॥

लेखक, प्रा. राम शेवाळकर

कालनिर्णय, नोव्हेंबर १९९५

' महाराष्ट्र धर्म' हा शब्द केव्हा प्रचारात आला असावा आणि तो कोणत्या अर्थाने?

समर्थांनी हा शब्द प्रतिष्ठित केला असे मानले जाते। समर्थांच्या वारंवार उद्धृत केल्या जाण्यार्या ओव्यांमध्ये हा शब्द आला आहे.

मराठा तितुका मेळवावा।
महाराष्ट्र धर्म वाढवा ।

ही ओवी राजकारण, समाजकारणापासून ते सांस्कृतिक क्षेत्रांपर्यंत सर्वत्र विविध हेतूंनी वरचेवर वापरली जाते. त्यामुळे समर्थांशी ह्या शब्दांचा संबंध स्वाभाविकपणेच गुंफला गेला आहे. समर्थांना तरी या शब्दाचा अर्थ काय अभिप्रेत असावा? मूळ राष्ट्रधर्मापेक्षा त्याचे काय वेगळेपण आहे? महाराष्ट्र धर्माचे स्वरूप काय ? व वैशिष्ट्ये कोणती? देशातील इतर प्रदेशांपेक्षा महाराष्ट्राचा व महाराष्ट्र संस्कृतीचा व्यवच्छेद नेमका कसा करता येईल? महाराष्ट्राजवळ असे काय आहे की जे देशातील इतर प्रांतांजवळ नाही?

येथे ओघानेच संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलन काळातील आचार्य अत्रे यांचे एक स्वाभिमानपुत विधान कुणालाही आठवेल. त्या संघर्ष काळातील गर्दीच्या सभांमध्ये आचार्य हा व्यवच्छेद सूचित करण्यासाठी अभिनिवेशाने असे उद्गार काढीत असत, " महाराष्ट्राला इतिहास आहे, इतर प्रांतांना फक्त भूगोल आहे" .

इतिहास व भूगोल या प्राथमिक अभ्यासक्रमांतील अविभाज्य विषयांवरची ही लोकप्रिय कोटी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अन्वर्थक व स्फूर्तिदायक ठरली असल्यास नवल नाही. एरवी ती पूर्णार्थाने पत्करण्याची गरज नाही. सर्वच प्रांतांना भूगोलाप्रमाणे एखादा इतिहास असतोच. राज्य पुनर्रचनेमुळे क्वचित भूगोल बदलला तरी त्या त्या भूमीशी तिचा इतिहास लगडलेला असतोच. पण आंदोलन काळात लोकांमध्ये स्फुरण उत्पन्न होण्यासाठी जेव्हा असे आवेशपूर्ण उद्गार काढले जातात तेव्हा त्याला स्वतःच्या हक्कासाठी लढा देणारे संदर्भ अभिप्रेत असतात.

सातवाहनांपासून यादवांपर्यंत आणि यादवांपासून शिवप्रभूंपर्यंत स्वतःचे स्वतंत्र स्वराज्य स्थापन करण्याचे, पराक्रमाच्या साह्याने साम्राज्यविस्तार करण्याचे, त्यातील प्रजेला अभय, स्वास्थ्य व सर्वांगीण कल्याणाची हमी अनुभवता येण्याचे, ज्ञान, विज्ञान, शास्त्रे, कला यांच्या निकोप विकासाला प्रोत्साहन देण्याचे, जनतेच्या स्वयंभू अभिक्रमशीलतेला निर्धास्त वाव देण्याचे अनेक स्फूर्तिदायक संदर्भ या इतिहासविषयक तेजस्वी उल्लेखांमध्ये दडलेले असतात. अशा विविध व विपुल अभिमानास्पद संदर्भांचा लाभ सर्वच राज्यांना तेवढ्या प्रमाणात झालेला असतो असे म्हणता यावयाचे नाही. शेवटी व्यपदेश प्राधान्यानेच होत असतो. हे लक्षात घेऊनच आचार्यांच्या या उद्गारांचा

विचार करावा लागेल. अलीकडच्या स्वातंत्र्य लढ्यातही स्वराज्याच्या आकांक्षेचा ओजस्वी भुभुःकार आणि तेजस्वी आविष्कार पंजाब, बंगाल व महाराष्ट्र या प्रदेशातच प्रामुख्याने झाला होता, हेही आपल्याला विसरता येणार नाही. मध्य युगामध्ये सार्वभारतीय संतांना प्रेरणा देणारी शिवशक्ती महाराष्ट्रातच घवघवीतपणे प्रगट झाली होती. या संपन्न व सकस पार्श्वभूमीमुळेच एखाद्या सामाजिक लढ्याचे नेतृत्व करणार्या समर्थ सारस्वतकाराच्या उत्स्फूर्त उद्गारांना तेज प्राप्त होते.

संपूर्ण समर्थ वाङ्मयातही महाराष्ट्र धर्म हा शब्द दोन - तीनदाच वापरला गेलेला आहे. महाराष्ट्रधर्म वाढवा या आदेशा अगोदर समर्थांचे राज्यपुरुषाला केलेले " महाराष्ट्र धर्म उरला आहे । तुम्हा कारणे" हे आवाहनही प्रगट झाले होते. स्थापन होऊ घातलेल्या, तशाच प्रस्थापित अशा स्वराज्याकडून अथवा राजसत्तेकडून समर्थांना कोणती अपेक्षा होती तेच या उल्लेखातून सूचित झाले आहे. त्यातून समर्थांना अभिप्रेत असलेल्या अर्थावर प्रकाश पडण्यासाठीही अगोदरच्या उल्लेखांचे संदर्भ उपयोगी ठरू शकतील.

समर्थांपूर्वी गुरुचरित्रात या शब्दांचा पहिला उल्लेख आहे. तसेच इ. स. १४४८ च्या महिकावतीच्या बखरीमध्येही - " देशांमध्ये बहुत यवन जाले. क्षत्रियांनी राज्य अभिमान सोडला. शस्त्रे सोडली. कृषि धरली. बहुत आचारहीन झाले. गोत्र, कुलगुरु, कुलस्वामीण सांगता विसरू लागले. जाणोन देवीने धर्म माराष्ट्र (महाराष्ट्र) रक्षायाकारणे नायकोरावास स्वप्न दिले. हा जातिमेळावा करावा. श्रीदेवी आद्यशक्ति जगदंबिका महाराष्ट्रधर्मरक्षिका तुम्हास प्रसन्न असो."

असे महाराष्ट्र धर्म रक्षणाचे प्रयोजन स्पष्ट करण्यात आले आहे. याच प्रयोजनाचे प्रतिबिंब पुढे सप्तप्रकरणात्मक चरित्रातील खुद्द शिवाजी महाराजांच्या मनोगतात स्पष्टपणे पडल्याचे आढळते.

" वडिलांनी मेळविले ते खाऊन राहणे योग्य नाही. आपण हिंदु. दक्षिण देश म्लेंछांनी ग्रासिला. देव, ब्राह्मण, क्षेत्रे, गाई यास बहुत पीडा झाली. धर्म अगदी बुडाला. तेव्हा धर्मरक्षणार्थ प्राणही वेचून धर्म रक्षावा."

हेच महत्त्व केशवाचार्यांनी " वेदशास्त्राच्या श्रेष्ठ, तसाच देशाचार व कुलाचार, सर्व धर्माचा जीव मूळ महाराष्ट्र धर्म." या शब्दात महिकावतीच्या बखरीतच अधोरेखित केले आहे. यातील वेदशास्त्राचार सर्वांना समानच असणार. अर्थात वेदशास्त्र जे प्रमाण मानतात त्यांना लोकमान्य टिळकांनी हिंदू धर्माचे लक्षण विवेचन करताना वेदप्रामाण्य लक्षणाला अग्रक्रम दिला आहे.

प्रामाण्य बुद्धिर्वेदेषु ।
साधनानामनेकता उपास्यानामनियमः ।
एतद् धर्मस्य लक्षणम् ॥

महाराष्ट्र धर्माचे लक्षण विवेचन करताना वेदशास्त्रानुरूप आचरणाला अग्रक्रम दिला जात असेल तर महाराष्ट्रात राहणार्या व विशेषतः हिंदुधर्मीयांकडे संकेत केला जातो. कुलाचार व देशाचार भिन्न भिन्न संभवू शकतात. कुलाचारांबद्दल निष्ठा तसेच देशाचाराचा आग्रह ही दोन लक्षणे विशेष लक्षणीय आहेत. धर्मशरणता व प्रदेशाच्या पृथगात्मक व वैशिष्ट्यपूर्ण आचाराचे अनुसरण अशी महाराष्ट्र

धर्माची केशवाचार्यांच्या मते तीन महत्वाची लक्षणे निष्पन्न होतात. यापैकी वेदप्रामाण्य व कुळधर्माचे अनुसरण यांचे अधिक स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता नाही. देशाचाराबद्दल बाकी विशदीकरण आवश्यक आहे.

महाराष्ट्र धर्म राष्ट्रधर्मापेक्षा काही वेगळा आहे काय या प्रश्नाचे उत्तर देशाचाराच्या विशदीकरणातून मिळू शकेल. स्वतःचा धर्म, भाषा व प्रदेशाबद्दलचा स्वाभिमान, प्रादेशिक पूर्वेतिहासाचे अभिमानपूत आकर्षण, स्वतःचे अस्तित्व प्रस्थापित करण्याचा अट्टाहास, हा सर्वांचा संकोच करू पाहणार्या सर्वशक्तिमान परिस्थितीचा प्राणपणाने प्रतिकार करण्याची सिद्धता, अन्यायाकडे न वाकण्याचा निर्धार व अस्मितेवर होणार्या सर्व प्रकाराच्या आक्रमणांशी बेधडक झुंज घेण्याची अनावर उर्मी ही लढाऊ महाराष्ट्र - माणसाची ठळक वैशिष्ट्ये सहज लक्षात येणारी आहेत. त्याबरोबरच ज्ञानशक्तीच्या केवलपणावर गाढ विश्वास, ज्ञानोपासना तन्मयेतेने करण्याची आवड, सृष्टिरचनेच्या मूलकंदाचे अचूक भान व त्याबाबतची निरपवाद शरण्यता, पाखंड खंडणाचा अखंड आवेश, तत्त्वनिष्ठेचा आग्रह हीही वैशिष्ट्ये इतिहासाने घेतलेल्या अग्निपरिक्षांमधून तावून सुलाखून निघाली आहेत. बाहूंमध्ये अन्यायाचा प्रतिकार करण्याची शक्ती, मेंदूमध्ये केवढ्याही मोठ्या आपत्तीला नामोहरम करण्याची युक्ती नि अंतःकरणात विश्वाच्या आद्यतत्त्वाबद्दलची भक्ती ही समर्थांना अभिप्रेत असलेली महाराष्ट्र धर्माची त्रिसूत्री आहे.

महाराष्ट्र धर्म हा शब्द समर्थांनी काटकसरीने वापरला असला तरी त्यात गर्भित असलेला हाच आशय विशद करण्यासाठी समर्थांच्या समग्र उपदेशाचा प्रपंच आहे.

शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने कार्य होतसे
शक्ति युक्ति जये ठायी । तेथे श्रीमंत नांदती ॥

ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंतच्या संतांनी प्रवाहित केलेल्या भक्तिश्रोतांच्या संगमतीर्थावर उभे राहून समर्थ शक्ती - युक्ती समन्वयाचा संदेश देतात. त्यातूनच स्फुरण मिळून देशाचा न देशाचा नकाशा बदलविणारे व नवा इतिहास घडविणारे श्रीमंत योगी तळपत राहतात.